

# 'आमचे अण्णा'

१० ऑगस्ट २०१५, सकाळी १० ची वेळ, सहज बातम्या बघू या म्हणून मी टी.व्ही. लावला, तर बातमी होती 'ललित कलादर्श' संस्थेचे सर्वेसर्वा श्री. भालचंद्र पेंढारकर म्हणजेच 'अण्णा' यांचे वार्धक्याने वयाच्या ९३व्या वर्षी निधन झाले, ही बातमी ऐकून सुन्न झाले व लगेच माझी धाकटी बहीण सौ. कल्पना हिला फोन करून ही दुःखद घटना सांगितली. ती ऑफिसच्या गडबडीत असल्यामुळे तिला ही बातमी कळली नव्हती. तिलाही ही बातमी ऐकून धक्का बसला.

तुसे आमचे व अण्णांचे नाते नसले तरी त्यांचे व आमचे घरोब्याचे संबंध होते, कारण माझी धाकटी बहीण सौ. कल्पना (पूर्वाश्रमीची कल्पना सुरपूर) अण्णांच्या बऱ्याच नाटकांत, बरीच वर्षे म्हणजे जवळ-जवळ १२/१३ वर्षांची असल्यापासून काम करत होती. अण्णांच्या बऱ्याच नाटकात तिने कामे केली. 'गोकुळचा चोर', 'शारदा', 'आनंदी-गोपाळ', 'सोन्याची द्वारका' इ. बऱ्याच नाटकांत अण्णांबरोबर छोट्या-मोठ्या भूमिका केलेल्या आहेत. श्री. अण्णा हे शिस्तबद्ध होते. त्यांची नाटके वेळेवर सुरू व्हायची. कधीही पुढे- मागे झालेली नाही. शिवाजी मंदिरला प्रयोग असला की, ते हमखास आमच्याकडेच उतरायचे. माझ्या वडिलांचे व त्यांचे संबंध घरोब्याचे होते, म्हणून ते हक्काने आमच्याकडे यायचे. चहा-पाणी, नाश्ता-जेवण पण ते आमच्याकडे करायचे. त्यांचा सर्वांत आवडता पदार्थ (पेय) म्हणजे कढी. अण्णा येणार म्हटल्यावर आमची आई कढी तयार ठेवत असे व ते आवडीने पीत असत. आमचे घर दादरला (पू.) स्टेशनजवळ असल्यामुळे बरेच कलाकार (अण्णांच्या नाटकातले) येत असत. आमची जागा लहान असूनसुद्धा सर्वजण हक्काने येत, कारण आमच्या आईबाबांचा स्वभाव सर्वांचे अगत्य करणे व सर्वांना आपलेसे करणे. त्यामुळे अण्णांनीसुद्धा कधी परकेपणा दाखवला नाही. खरं म्हणजे एवढा मोठा कलाकार आमच्या घरी येऊन आमच्या सर्वांशी प्रेमाने व आपलेपणाने ते वागत असत. त्यांच्या स्वभावामुळे नाटकातील सर्व कलाकारांना अण्णांबद्दल आदर होता. ते सर्वजण त्यांना मान देत असत. सर्वांना ते समानतेची वागणूक देत असत. Back stage Artiest ना पण ते आदराने वागवत असत. सर्वांची विचारपूस करणे, तसेच सर्वांचे जेवण झाले की नाही, याची चौकशी करून मगच ते जेवत असत. वक्तशीर, प्रेमळ व सज्जन असे आमचे अण्णा आता आपल्यात नाही, हे खरेच वाटत नाही. 'मरावे परि कीर्तिरूपे उरावे!' असेच अण्णांच्या बद्दल म्हणावे लागेल.

आमच्या सर्व सुरपूर बंधू-भगिनींतर्फे अण्णांना शतशः प्रणाम! हीच त्यांना श्रद्धांजली!

**- श्री. वैशाली के. देसाई**
**मुलुंड (पूर्व)**

मुलगा : ओ काका, कुल्फी कितीला आहे?
कुल्फीवाला : १०, २०, ३० रुपयांना..
मुलगा कुल्फी खातो, आणि घरी जायला निघतो.
कुल्फीवाला : अरे, पैसे दे की?



मुलगा :आमच्या घरचे म्हणत्यात खा,
प्या मजा करा..पण पैशाचा लाड नाही करायचा...!


**VIDISHA ENTERPRISES**

**Tally Partner**

**We provide all Services for Tally Accounting Software**

21/272, Yamunanagar,
Nigdi, Pune - 411 044

**Mob.** : +91-9970156307
**Tel.** : +91-20-27660748
**Email** : meghanathakur@yahoo.com

**॥ रेशीम गांठी ॥** ®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
**माफक फी, वेबसाईट फ्री**
☎ २५४६९१५८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
**सुखी वैवाहिक जीवनासाठी समुपदेशन**

**वधू-वर नोंदणी पत्रिका, भविष्य आणि परिचय मेळावे**